**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

VOL- IX | ISSUE- XI | NOVEMBER | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# ललित कलांमध्ये संगीताचे स्थान

**प्रा. डॉ. उत्तरा र. तडवी (प्रधान)**
सहा. प्राध्यापक (संगीत)
श्री. शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अकोट
E-mail-uttaratadavi81@gmail.com

**सारांश :–**

*ललित कलेचा अर्थ म्हणजे ती कला जी आनंद, सौंदर्य देते संगीत कला ही आनंद आणि सौंदर्य या गुणवत्तेत आघाडीवर आहे. इतर कलांमध्येही लालित्य असले तरी काव्यकला ही या क्षेत्रात खूप पुढे आहे, परंतु असे म्हणता येईल की, ''संगीत ही मानव जातीची वैश्विक भाषा आहे''. कवितेतील अभिव्यक्तीचे माध्यम शब्द असल्याने आवाका अगदी सरळ होतो. कारण काव्य कितीही सुंदर असले तरी भाषेचे ज्ञान असल्याशिवाय ते समजू शकत नाही. पण जर कलाकाराच्या गळयातून गातांना दुःख भरलेले स्वर निघतात तेव्हां जगाच्या काना कोप–याला ते समजेल, तिथे काही दुःख आहे तिथे बोलणे निःशब्द होते तिथे संगीत बोलते. आज संगीताला सर्व ललित कलांमध्ये अग्रेसर होण्याचा मान मिळाला आहे. प्रत्येक कला माध्यमाकडे पाहिल्यास आपण समजू शकतो की संगीत ही एकमेव कला आहे ज्यामध्ये बाहय देखाव्याची आणि बाहय साधनांची गरज नसते. प्रत्येक कलेचे माध्यम वेगळे असते. माध्यम कोणतेही असो, ते कलात्मक असायला हवे. ललित कलांमध्ये संगीताला सर्वोच्च स्थान मिळाले आहे. संगीत सर्व कलांमध्ये श्रेष्ठ आहे कारण त्याच्या आधाराची सूक्ष्मता, विपूल आनंद इतर कोणत्याही कलेमध्ये नाही.*

***शोधनिबंधाची उद्दीष्टे :–***

1) *'कला' संकल्पनांचे अध्ययन करणे.*
2) *ललित कला आणि संगीत कला यांचा परस्पर संबंध अभ्यासणे.*

***संशोधन पध्दती :–***

*सदर शोधनिबंध लिहिण्याकरीता व्दितीय माहितीचा आधार घेण्यात आला आहे. ही व्दितीय माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधन लेख, पुस्तके, मासिके यांचा वापर करून प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन करण्यात आले आहे.*

**प्रस्तावना :–**

'कला' शब्द सौंदर्य या अभिव्यक्तीचे द्योतक आहे. 'सौंदर्य निर्माण करते, ती कला' ही कलेची ढोबळमानाने व्याख्या करता येईल. 'कला' हा शब्द व्यापक रूपाने उपयोजिला जातो. कला शब्दाची उत्पत्ति 'कला' धातू पासून मानली जाते. कला शब्दाची सिध्दी 'ला' धातुने होते, ज्याचा अर्थ होतो प्राप्त करणे अथवा निर्माण करणे अर्थात जे काही केले असता सौंदर्यात्मक, सौंदर्यकारक परिणाम निर्माण होतो, सुखभाव निर्माण होतो, मन आनंदित होते, ती 'कला' असेही आपण म्हणू शकतो. सार्वसधारणपणे कोणतेही कार्य चातुर्याने, कौशल्याने, सुंदर स्वरूपात केले गेले, तर सामान्य भाषेमध्ये त्याला 'कला' असे म्हटले जाते.

सौंदर्यशास्त्राच्या तत्वांनुसार सर्व सौंदर्य निर्माण करणा–या क्रिया असल्या तरी त्या सर्वांना 'कला' म्हणता येणार नाही. आणि म्हणून नक्की 'कला' म्हणजे काय, हे अभ्यासणे आवश्यक आहे.

प्लेटो ने कलेची व्याख्या करतांना म्हटले आहे, "Art is shadow of shadow".

हर्बट रीड यांनी कलेची व्याख्या खालीलप्रमाणे सांगितली आहे. "Art is most simply and usually defined as an attempt to create pleasing forms". Such forms satisfy our sense of Beauty and Sense of Beauty is satisfied when we are able to appreciate, a unity or harmony of formal relation among our sense perceptions.

रविंद्रनाथ टागोर यांच्या मते, ''मानवी हृदयातील भावना व्यक्त करणे ही कला आहे.''

ॲरिस्टॉटलने कलेची व्याख्या करतांना म्हटले आहे की, ''कलाकार कलेसाठी चांगल्या गुणांचे अनुकरण करून आपल्या भावना आणि अनुभवांचा अंतर्भाव करतो, ज्यामुळे त्यात चैतन्य येते.'' कला ही मानवी कृती आहे ज्याचे विशेष वैशिष्टय म्हणजे

काळजीपूर्वक पाहणे, चिंतन करणे, संकलन करणे आणि स्पष्टपणे व्यक्त करणे होय. आंग्ल भाषेतील 'आर्ट' शब्द अत्याधिक व्यापक आहे. 'आर्ट' शब्दाचे तात्पर्य म्हणजे शारीरिक आणि मानसिक कौशल्याव्दारे वस्तुचे निर्माण करणे होय. काळाच्या ओघात या शब्दाचा अर्थ अधिक सूक्ष्म पध्दतीने होऊ लागला आणि त्या अंतर्गत स्थापत्य, शिल्पकला, चित्रकला, संगीत आणि काव्य इत्यादी विषयांवर चर्चा होऊ लागली. त्यमुळे 'आर्ट' या शब्दाच्या जागी 'फाईन आर्ट' हा शब्दप्रयोग होऊ लागला ज्याला भारतीय वांड्.मयामध्ये त्याला ललीत कला असे संबोधले जाऊ लागले.

प्राचीन काळापासूनच माणूस कलेच्या माध्यमातून आपल्या आकांक्षा, आनंद, दुःख व्यक्त करत आला आहे. कलेमध्ये एक प्रेरणास्त्रोत आहे, ज्याव्दारे मनुष्य कोणतेही कार्य पूर्ण करतो. मानवी भावनांना व्यक्त करण्यातच कलेची भव्यता असते.

भरताच्या नाट्यशास्त्रामध्ये ललित कलेच्या संदर्भात कला शब्दप्रयोग 'शिल्प' या नावाने ओळखला जातो. पाणिणी ने देखील ललीत कलांसाठी 'शिल्प' या शब्दाचा प्रयोग केलेला आहे जो मुख्यतः कला कौशल्याचा बोधक आहे. त्यांच्या मतानुसार शिल्पचे दोनभाग आहेत चारू आणि कारू. चारूच्या अंतर्गत संगीतादि ललित कलांचा समावेश होतो. परंपरेने ज्या कलांचे प्रयोजन केवळ सौंदर्य बोधात्मक असेल, त्या ललित कला आणि ज्याने केवळ भौतिक आवश्यकता पूर्ण होतील त्या उपयोगी कला होय.

उदा. (1) एखाद्या गृहिणीने दिवाणखान्यातील खुर्च्या, टेबल, खिडकीचे पडदे, भिंतीवरील छायाचित्रे, टेबलावरील फुलदाणी इत्यादी वस्तु अत्यंत व्यवस्थितपणे मांडल्या, तर तो दिवाणखाना निश्चितपणे मनाला आनंद देईल.

उदा. (2) प्रथितयश व्यावसायिक कुशल वेशभूषाकाराने लग्नसमारंभाकरीता पोशाख बनविला आहे.

उपर्युक्त दोन्ही उदाहरणे, ही कलाकृतीची निर्मिती ही मुख्यतः मानवाची सोय, सुविधा आणि उपयोग याकरता झालेली असते म्हणून ती ललीत कला म्हणता येणार नाही.

वस्तुतः सर्वप्रथम वात्सायनाने कलांची संख्या 64 इतकी सांगितली. या कलांमध्ये–संगीत, काव्य, मुर्ती, चित्र आणि स्थापत्य या कलांना श्रेष्ठ मानल्या गेले. ललितकला म्हणजे असा कला प्रकार, ज्यांचा मुख्य उद्देश हा केवळ सौंदर्यनिर्मिती हा असतो, व्यवहार किंवा व्यापार हा नसतो.

**उपयोजित कला** (Applied Art) :–

मानवी उपयोगाकरिता सौंदर्यात्मक कलानिर्मिती केली जाते, त्यास 'उपयोजित कला' म्हणतात. (Architecture, Photography, Insustrial Design, Graphic Desighn, Fashion Design, Decorative arts)

**प्रयोगजीवी कला** (Performing Art) **:-**

जी कला प्रयोगाच्या आधारे प्रत्येक वेळेला नव्या रूपाने प्रस्तुत केली जाते, त्या कलेला 'प्रयोगाधिष्ठीत कला' असे म्हटले जाते. या प्रस्तुतीकरणात कलाकाराची उपस्थिती आणि जिवंत सहभाग अपेक्षित आहे. संगीत, नृत्य, नाट्य इत्यादी कलाप्रकार मोडतात.

मानवीय भावभावनांची सर्वात सुंदर अभिव्यक्तीचे साकार रूप म्हणजेच कला ! मनुष्य जेव्हां आपले विचार सुंदर आणि आकर्षक रितीने व्यक्त करतो, तेव्हा त्याच्या गुणांची अभिव्यक्ती कलेचे रूप धारण करते. त्या अतिसुंदर कलेचा सर्वात सुंदर असा म्हणजेच ललित कला.

कलांचे लक्ष मनुष्याला भौतिक सुखदुःख विसरून अलौकीक आनंद प्राप्त करून देणे होय. इतर कला जसे चित्रकला, शिल्पकला या कला बुध्दीच्या संयोगाने भाव उत्कर्ष करण्यात सफल होतात. या कला दृष्यस्वरूपात म्हणजे डोळयांनी अनुभवता येणा–या कला आहे म्हणून या कलेच्या आविष्कारानंतर, निर्मितीनंतर तेथे प्रदर्शनासाठी कलाकार असायलाच हवा हे आवश्यक नसते. परंतु संगीत कला सरळ आत्म्याला प्रभावित करून आपल्याला आनंद आणि प्रेरणा देते. शिवाय संगीत ही श्राव्य कला असल्यामुळे संगीत कलेच्या प्रत्येक सादरीकरणासाठी कलाकाराला प्रत्यक्ष हजर राहून आपल्या कलेचे प्रस्तुतीकरण करावे लागते.

संगीत म्हणजे निर्भेळ आनंद देणारी कला आणि कला म्हटलं की, विशिष्ट बंधन पाळून केलेला सौंदर्य विलास सौंदर्याचे एक वेगळे विश्व निर्माण करून रसिकांच्या मनात निरपेक्ष आनंदाचा उद्भव हा कलेच्या प्रस्तुतीकरणाच्यसा माध्यमातून होत असतो. नैसर्गिकदृष्टया प्रत्येक व्यक्तीलाच सौंदर्यविषयीची जाणीव असते परंतु प्रत्येकच व्यक्ती सौंदर्याविषयी अनुभूती व्यक्त करण्याइतकी समर्थ नसते. परंतु

संवेदनशील व निर्मितीक्षम कलकार आपल्या आवडीच्या कला प्रदर्शनातून सौंदर्याची अभिव्यक्ती करू शकतो.

संगीतामुळे मनोरंजन न होणारा माणूस विरळच अर्थात 'केवळ मनोरंजन' एवढंच काही संगीत श्रवणातून साध्य होत नसतं. मनुष्याला संगीत संपन्न, समृध्द करून जात असतं. कलांचा परस्परांशी प्रगाढ असा संबंध आहे. परस्परांमधील सामंजस्याविना त्या अपूर्ण असल्याचे जाणवते. कलेच्या अंतर्गत कलेच्या अनेक शैली, तंत्र आणि कौशल्य, लोकांची बदलती कलात्मक अभिरूची एवढेच नव्हे, तर काव्यशास्त्र, नाटय इत्यादींचा समावेश केला गेला आहे.

(1) काव्यकला — (शब्द आणि भाषेच्या माध्यमाव्दारा भावाभिव्यक्ती)
(2)चित्रकला—(निसर्गातील देखाव्यांना चित्र फलकावर उतरविणे)
(3)मूर्तिकला —(भावनांना मूर्तीच्या रूपामध्ये साकार करणे)
(4)वास्तुकला—(इमारत बांधकामाच्या स्वरूपात)
(5)संगीतकला— सात स्वरांच्या माध्यमाने भावाभिव्यक्ती.

संगीतकलेमध्ये स्वर, लय, ताल, शब्द यांच्या कलापूर्ण नादाकृती निर्माण केल्या जातात. ज्या निर्माण झाल्या—झाल्याच वातावरणात विरून जातात. या नदाकृती चित्र—शिल्पाप्रमाणे गोठवता येत नाहीत. त्यामुळे त्यांचा आस्वाद त्यांच्या निर्मितीकाळातच घेतला पाहिजे. चित्र—शिल्पाचा आस्वाद आपण डोळयांनी घेतो, याउलट संगीताचा आस्वाद कानांनी घेतो आणि नृत्याचा आस्वाद डोळयांनी आणि कानांनी घेत असतो.

संगीत हे नादव्दारा निर्मित सात स्वरांवर आधारित आहे. हा ध्वनी सूक्ष्म श्रुति—तत्वांवर आधारित असतो आणि अमर्याद सौंदर्य व व्यापक प्रभाव प्रकट करतो. ललित कलांमध्ये संगीताला सर्वात प्राचीन मानले गेले आहे. जेव्हा माणसाला भाषेचे ज्ञान नव्हते, तेव्हाही कोणत्या ना कोणत्या रूपामध्ये संगीत अस्तित्वात होते. आदिमानव आपण उद्गार, हर्ष, खेद इत्यादी चाचून, गुनगुणून किंवा टाळया वाजवून व्यक्त करत असे. संगीताचा संबंध गायन, वादन आणि नृत्याशी आहे. संगीताव्दारे मनुष्य आपल्या भावना व्यक्त करतो ज्यामुळे इतर लोकांचे मनोरंजन होते.

भारतीय संगीत हे भारतीयांच्या जीवनशैलीचे मूलभूत केन्द्र आहे. इथे संगीताला अत्यंत पवित्र आणि परमेश्वराकडून प्राप्त झालेली, तसेच त्याला परत समर्पित कला या स्वरूपात मानले जाते. डॉ. संपूर्णानंद म्हणतात, "Music art and literature lead a person from lower level of physical existence to a higher spiritual plane and this way helped in self-purification."

**निष्कर्ष** :—

हिगलने ललितकलांमध्ये काव्यकलेला सर्वोच्च स्थान दिले आहे, पण भारतीय कलाकारांनी मात्र संगीत केलेला, दोन्हींचा आधार कलात्मक कल्पना हा आहे. तात्पर्य हेच काही विद्वानांनी काव्यकला श्रेष्ठ मानली तर काहींनी संगीतकला. इथे इतर ललीत कलांमध्ये श्रेष्ठ, कनिष्ठ अशी तुलना करणे आम्हाला अपेक्षित नाही तर माझा हेतू संगीत कलेचा कलात्मक तत्वे आणि प्रभाव व्यक्त करणे हा आहे.

**संदर्भग्रंथ** :—

(1) डॉ. वसुधा कुळकर्णी — भारतीय संगीत एवं मनोविज्ञान— Page No. 27 राजस्थानी ग्रंथागार प्रकाशन—2013
(2) संगीता घोष—रसतत्व विमर्श— Page No. 147, 148 पिलग्रिम्स प्रकाशन, वाराणसी—2009
(3) डॉ. सीमा शर्मा—सांगीतिक बंदिश रचना, सिध्दांत एवं स्वरूप—Page No. 1 कनिष्क पब्लिकेशन, नवी दिल्ली—2016
(4) सुधीर माईणकर—संगीत कला विहार (मासिक)— Page No. 16, 17 अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ प्रकाशन, मुंबई—डिसेंबर 2011
(5) राजेश कुमार पोलस्त—संगीत कला विहार (मासिक)—Page No. 24 अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ प्रकाशन —ऑक्टोबर 2010
(6) डॉ. रूची गुप्हा—भारतीय संस्कृती शाश्वत जीवनदृष्टी एवं संगीत—Page No. 137 कनिष्क पब्लिकेशन्स, नवी दिल्ली—2006.